THAKUR TRUSTS
Zugdu Singh Charitable Trust's (Regd.)
THAKUR COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY
(Approved by AICTE, Govt. of Maharashtra & Affiliated to University of Mumbai*)
Institute Accredited by National Assessment and Accreditation Council (NAAC), Bangalore#
Programmes Accredited by National Board of Accreditation (NBA), New Delhi**
Among Top 200 Colleges in the Country where Ranked 193rd in NIRF India Ranking 2019 in Engineering College category

A - Block, Thakur Educational Campus,
Shyamnarayan Thakur Marg, Thakur Village,
Kandivali (East), Mumbai - 400 101.
Tel.: 6730 8000 / 8106 / 8107
Fax : 2846 1890
Email : tcet@thakureducation.org
Website : www.tcetmumbai.in • www.thakureducation.org

tcet
ISO 9001:2015 Certified

*Permanent Affiliated UG Programmes : • Computer Engineering • Electronics & Telecommunication Engineering • Information Technology (w.e.f. A.Y. 2015-16) • Electronics Engineering (w.e.f. A.Y. 2017-18)
**3rd cycle NBA Accredited UG Programmes : • Computer Engineering • Electronics & Telecommunication Engineering • Information Technology (3 years w.e.f. 01-07-2019)
**2nd cycle NBA Accredited UG Programmes • Electronics Engineering (3 years w.e.f. 01-07-2019)
# 1st cycle of NAAC Accreditation : • "A" Grade for 5 years (w.e.f. 30-10-2017)

# NOTICE

Sr.No./ Principal/ 88 of 2019 Date: 14.06.2019

**TO ALL F.E. to M.E. STUDENTS**

**Sub: MahaDBT portal online link remain open w.e.f. from 11.06.2019 to 30.06.2019 for all MahaDBT Scholarships for academic year 2018-19.**

**Ref: JT. DTE letter no.2/Vkamu/Tanshi/EBC/2019/1602, Dated : 14-06-2019.**

All the F.E. to M.E. students admitted through CAP Round of the college are hereby informed that, MahaDBT portal online link remain open w.e.f. from 11.06.2019 to 30.06.2019 for all MahaDBT portal scholarships for academic year 2018-19.

**All eligible students have to apply Online on** http://mahadbtmahait.gov.in **for the fresh / Renewal of scholarship-2018-19 and must submit the application form with supporting documents on or before 27th June, 2019 in administrative office.**

**(Dr. B.K. Mishra)**
**Principal**

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९

ई-मेल- *jtdirrom@gmail.com* *website – www.jdteromumbai.com*


परिपत्रक
**कालमर्यादीत/अतितात्काळ**

क्र. २/विकामुं/तंशि/डीबीटी/२०१९/ ९६०२

दिनांक : 14 JUN 2019


THAKUR COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY
KANDIVALI (EAST)
MUMBAI - 400 101.
Received on 14·06·19 Time 5·10
Inward No 463 By Site
INWARD TYPE - CORRESPONDENCE


प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत,
खाजगी विनाअनुदानीत व कायम
विनाअनुदानीत व्यावसायिक संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या <u>योजनांसाठी अर्ज करण्यासाठी व तपासणी करण्यासाठी देण्यात आलेली मुदतवाढ..</u>

संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र १८/तंशिसं/डीबीटी/२००१८-१९/२८०, दि.११/०६/२०१९

या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत, खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत व्यावसायिक संस्थाना उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यांत येत असलेल्या योजनांसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी व संस्थांना ऑनलाईन तपासणी करुन अर्ज निकाली काढण्यासाठी २ वेळा मुदतवाढ देण्यांत आलेली होती. तरीही काही विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत अर्ज न भरल्याने तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची तपासणी संस्था स्तरावर प्रलंबित असल्याने शासनाकडून अर्ज भरण्यासाठी व प्रलंबित अर्जांच्या तपासणी करुन अर्ज निकाली काढण्यासाठी **दि. ३०/०६/२०१९** पर्यंत मुदतवाढ देण्यांत आलेली आहे.

सर्व संबंधित संस्थांना सूचित करण्यांत येते की, संस्थांमधील ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरले नसतील अशा योजनानिहाय पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना विहीत मुदतीत म्हणजेच दि. ३०/०६/२०१९ पर्यंत संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबतच्या सूचना संस्थेच्या दर्शनीभागी सूचना फलकावर जाहिर करावी. तसेच सर्व वर्गांमध्ये विद्यार्थ्यांना कळेल अशा बेताने घोषणाही करावी व संस्थेच्या वेबसाईटवर याबाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी. संबंधीत संस्थांना पुन्हा कळविण्यांत येते की, पात्र विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या कारणास्तव संस्था स्तरावर, प्रलंबित असलेले अर्ज अंतिम दिनांकापूर्वी निकाली (मंजूर/नामंजूर) काढावेत. तसेच विद्यार्थ्यांचे sent back करण्यांत आलेले अर्ज अगर विद्यार्थी / क्लार्क / प्राचार्य यांच्या लॉगिनमध्ये पुढील कार्यवाहीसाठी प्रलंबित असतील तर अशा अर्जाबाबतची प्रलंबित कार्यवाहीसुध्दा अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करुन निकाली काढावेत. दि. ३०/०६/२०१९ ही अंतिम तारीख असल्याने प्रलंबित अर्ज व आता नव्याने प्राप्त होणाऱ्या अर्जांबाबतची कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण करावी. विहीत मुदतीत कार्यवाही पूर्ण न केल्यास प्रलंबित राहणारे अर्ज सिस्टीमद्वारे आपोआप रद्द होतील व अशा रद्द झालेल्या अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत संस्था प्रमुखांची राहील. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी. तसेच याबाबत विद्यार्थ्यांनाही सूचना प्रसारित करुन सूचित करावे.

(जितेंद्र रा. निखाडे)
सहाय्यक संचालक (तां),
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

*टीप : सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, अंतिम तारखेपर्यंत न थांबता वंचित राहिलेल्या पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घ्यावेत व संस्थांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे अर्ज अंतिम तारखेपर्यंत न थांबता तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.*

प्रत माहितीसाठी : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

F/C


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई – ४०० ००१.

दूरध्वनी – २२६१७९६९ फॅक्स-२६९०००७

E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


तात्काळ – स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे

क्रमांक: १८/तंशिसं /डीबीटी /२०१८-१९/ २८०

दिनांक : ११ /०६/२०१९

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी अर्ज करण्यासाठी व तपासणी करण्यासाठी देण्यात आलेली मुदतवाढ....

संदर्भ :- १) या संचालनालयाचे पत्र क्र.:१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/१०४, दि. ०२/०३/२०१९

२) या संचालनालयाचे पत्र क्र.: १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१८-१९/२३६ दि. २० /०५ /२०१९

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी संदर्भीय पत्र क्र.१ व २ नुसार विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी व संस्थांना अर्जांची ऑनलाईन तपासणी करुन अर्ज निकाली काढण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. तरीही काही विद्यार्थ्यांकडून विहीत मुदतीत अर्ज न भरल्याने तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जांची तपासणी संस्था स्तरावर प्रलंबित असल्याने, शासनाकडून अर्ज भरण्यासाठी व प्रलंबित अर्जाच्या तपासणी करुन निकाली काढण्यासाठी दि. ३०.०६.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी या पत्राद्वारे सर्व विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांना व संस्थांमार्फत सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे की ज्या पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अद्याप अर्ज केलेला नाही त्यांनी विहित मुदतीत म्हणजे दि. ३०.०६.२०१९ पर्यत संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे व संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी याबाबतची सूचना संस्थेच्या दर्शनी सूचना फलकावर जाहिर करावी व कोणताही पात्र विद्यार्थी लागू असलेल्या संबंधित योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: घ्यावी. तसेच, संबंधित संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन ऑनलाईन प्राप्त झालेल्या/होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्जांची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करुन दि. ३०.०६.२०१९ पर्यंत पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईनरित्या पाठवावे अन्यथा या तारखेनंतर प्रलंबित राहिलेले अर्ज सिस्टिमद्वारे नामंजूर करण्यात येतील व नामंजूर अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहिल तसेच यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याबाबतची नोंद विद्यार्थी / संस्थांनी घ्यावी. विभागीय कार्यालयांनी त्याबाबतच्या सूचना संबंधित संस्थांना द्याव्यात ( संस्थांना पाठविलेल्या पत्राची एक प्रत संचालनालयाला पाठविण्यात यावी.)

तसेच सर्व विभागीय कार्यालयांनादेखील सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्थामार्फत ऑनलाईन प्राप्त झालेल्या/होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्जांची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करुन दि. ३०.०६.२०१९ पर्यंत पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईनरित्या पाठवावे अन्यथा या तारखेनंतर प्रलंबित राहिलेले अर्ज सिस्टिमद्वारे नामंजूर करण्यात येतील व नामंजूर अर्जांची सर्वस्वी जबाबदारी विभागीय कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )

संचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

टीप – अंतिम तारखेपर्यत न थांबता वंचित राहिलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन घ्यावे व संस्था / विभागीय कार्यालय यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे अर्ज अंतिम तारखेपर्यत न थांबता तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.